महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५५५६२३४/२५५५७९७५
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/आस्था१/२०२०/मत्ता व दायित्व/१५४४ दिनांक ११/०५/२०२०

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र/
तंत्र निकेतने व तत्सम संस्था/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय,
पुणे विभाग पुणे.

विषय :- गट अ,ब अधिकारी तसेच गट क मधील कर्मचारी यांची मत्ता व दायित्व यांची वार्षिक विवरणपत्रे सादर करणेबाबत.

संदर्भ : - महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक. वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११ दिनांक ०२/०६/२०१४.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन दिनांक ०२/०६/२०१४ रोजीचा शासन निर्णय पहावा. आपल्या संस्थेतील कार्यरत असलेले गट अ, ब मधील अधिकारी व गट क मधील कर्मचारी यांची मत्ता व दायित्व विवरणपत्रे खालील सूचना लक्षात घेवून त्याप्रमाणे या कार्यालयास दिनांक ३१ मे २०२० पुर्वी सादर करावीत.

०१.आपल्या संस्थेतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या विवरणपत्राच्या सिलबंद लिफाफ्यावर संबंधितांचे पूर्ण नांव, पदनाम, कार्यरत संस्थेचे नांव ठळक अक्षरात लिहीलेले असणे आवश्यक आहे.

०२.गट अ, गट अ व ब (प्रशासकीय संवर्ग) तसेच गट क मधील कर्मचारी वर्गाची संवर्गनिहाय स्वतंत्र यादी खालील दिलेल्या विवरणपत्रात तयार करून यादीतील अनुक्रमांकानुसार प्रत्येक लिफाफ्यावर क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. यादी तयार करताना ती Ms-excel-DV-TTNatraj मध्ये तयार करून त्याची सॉफ्ट कॉपी ropune@dtemaharashtra.gov.in वर मेल करावी.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे नाव | विवरणपत्र सादर केलेले नसल्यास त्याबाबतचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |

०३.सदर माहिती कालमर्यादित असल्यामुळे प्रतिनियुक्तीने इतरत्र कार्यरत असणारे अधिकारी/कर्मचारी यांचेसहित संस्थेतील सर्व कार्यरत अ,ब व क वर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची उपरोक्त विवरणपत्रे दिनांक ३१ मे २०२० पर्यंत या कार्यालयास सादर करावी.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत - संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.
या कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, त्यांची विवरणपत्रे भरुन ती बंद लिफाफ्यात कार्यालयातील गोपनिय विभागाकडे सादर करावीत.

Scanned with CamScanner